**रे.मु.नं. ३८१/२०१९**
सुलोचनाबाई व इतर वि.
प्रकाश व इतर
नि. ५० वरील आदेश

**<u>अर्ज (निशाणी ५०) वरील आदेश</u>**

प्रतिवादी क्र. १ ते ५ आणि १० यांनी सदरचा अर्ज 'उलटतपास नाही' हा आदेश रद्द करुन मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. सदर प्रतिवादींनी असे कथन केले आहे की, त्यांनी कैफियत दाखल केलेली आहे. परंतु कोरोना महामारीमुळे त्यांचे चार सख्खे मामा आजारी होते आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे प्रतिवादी हे कोर्टात हजर राहू शकले नाही. म्हणून वादी क्र. २ (वा.सा. १) चा उलटतपास घेणे त्यांना शक्य झाले नाही. त्यामुळे दि. १९/०६/२०२१ रोजी 'उलटतपास नाही' असा आदेश पारित झाला. सदर प्रतिवादींनी 'उलटतपास नाही' चा आदेश रद्द करण्यास विनंती केली आहे.

३. वादींनी सदर अर्जाला हरकत नोंदविली. वादींच्या कथनानुसार प्रतिवादींनी विनाकारण दाव्याचे कामकाज लांबविण्यासाठी सदरचा अर्ज दिलेला आहे. पुढे त्यांच्या म्हणण्यानुसार 'उलटतपास नाही' चा आदेश हा कायदेशीर आहे. वरील कारणास्तव वादींनी सदरचा अर्ज नामंजूर करण्यास विनंती केली आहे.

४. प्रतिवादी क्र. १ ते ५ आणि १० यांच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. वादींच्या विद्वान वकीलांचा पुकारा केला असता गैरहजर.

५. वादींनी प्रस्तुतचा दावा, दावा मिळकतीचे सरस-निरस मानाने वाटप होवून मिळण्यासाठी आणि दावा मिळकतीची मोजणी होवून हद्दी कायम होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. वादी क्र. २ हनुमंत पटारे (वा.सा.१) याने त्याचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र

(नि.४७) दि. २०/०३/२०२१ रोजी दाखल केलेले आहे. त्यानंतर प्रतिवादींना अनेकवेळा संधी देवूनही त्यांनी वादी क्र. २ (वा.सा.१) चा उलटतपास घेतलेला नाही म्हणून दि. १९/०६/२०२१ रोजी 'उलटतपास नाही' असा आदेश पारित करण्यात आला. कोरोना महामारीमुळे ब-याच कालावधीसाठी न्यायालयीन कामकाज देखील फक्त अत्यंत तातडीच्या प्रकरणांसाठी व सिमित वेळेमध्ये चालू होते ही वस्तुस्थिती आहे. प्रतिवादींनी नमुद केलेल्या कारणांचा विचार करून प्रतिवादींना वादी क्र. २ (वा.सा.१) चा उलटतपास घेण्याची परवानगी देणे न्यायोचित होईल. त्यामुळे मी खालील आदेश पारित करीत आहे -

**- आदेश -**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. दि. १९/०६/२०२१ रोजी वादी क्र. २ (वा.सा.१) चा 'उलटतपास नाही' असा झालेला आदेश खर्च रू. ३००/- च्या अटीवर रद्द करण्यात येतो.

(**श्रीमती सु. ध. सोनी**)
दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),
**नेवासा**

**दिनांक -२०.११.२०२१**